**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
Mumbai – 400 020.

**श्रीमती ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

**A-Grade (CGPA 3.08)**

Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

संलग्नता विभाग/परीपत्रक/२०२४-२५/ 810

मे २८, २०२४.

# परीपत्रक

प्रति,

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांच्या माहीतीस्तव व उचीत कार्यवाहीकरीता...

विषय: शिक्षकीय पदांच्या नियुक्ती मान्यतेबाबत (Staff Approval 2023-24)

संदर्भ : परीपत्रक क्र.

१. Affi./Circular/2017-18/425 dated 15.06.2017.
२. संलग्नता/ पदमान्यता/ २०२२-२३/३५२, दिनांक २० एप्रिल, २०२२.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास येते की, संस्थेमार्फत ठराव मंजूर करुन दरवर्षी महाविद्यालयात शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या जातात. परंतू, त्याबाबतचे नियुक्ती प्रस्ताव विद्यापीठ मान्यतेकरिता सादर केले जात नाहीत. तसेच नियुक्ती वेळेस गठीत केलेली निवड समिती ही नियमानुसार आहे किंवा नाही, याचीही दक्षता घेतली जात नाही. सदर पदांचा कार्यभार अर्हताप्राप्त नसलेल्या अध्यापकांकडे प्रदिर्घ काळासाठी देउन कामकाज चालवत असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे, म्हणून ज्या महाविद्यालयांमध्ये शिक्षकीय पदे नियमित स्वरुपात भरलेले नसेल, अशा महाविद्यालयांवर विद्यापीठ कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

शिक्षकीय पदांची विद्यापीठ मान्यता मिळविणे अनिवार्य असून काही प्रकरणे महाविद्यालय पातळीवर प्रलंबीत असल्यास खालील नमूद सुचीनूसार दस्ताऐवज जोडून विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे दिनांक १५ जून, २०२४ पर्यंत सादर करावेत. या उपरोक्त उशीराने प्रकरणे या विभागामार्फत कोणत्याही कारणे स्विकारण्यात येणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

- **आवश्यक दस्ताऐवजांची सुची :**

१. विद्यापीठाने दिलेले जाहिरात मान्यता पत्र
२. वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीरातीची प्रत
३. निवड समिताचा अहवाल
४. संस्थेचा ठराव
५. नियुक्ती पत्रे
६. रुजू अहवाल
७. उमेदवारांचे पासपोर्ट साईज फोटो (१)
८. उमेदवारांचे शैक्षणिक गुणपत्रके (पदवीधर, पदव्युत्तर, एम.फील, सेट-नेट, आचार्य इ.)
९. ओळखपत्र (जन्मतारीखेची नोंद असलेले)

सदर विषयाबाबत अधिकच्या माहिती करीता विद्यापीठाच्या संलग्नता विभागाशी दुरध्वनी क्रमांक ०२२-२२०९१५७७ किंवा ई-मेल affiliation@sndt.ac.in वर संपर्क साधावा.

- **संस्थाचालक/ प्राचार्य/ प्रभारी प्राचार्य यांनी वरील बाबींची गांभीर्याने नोंद घेवून आपल्या पातळीवर योग्य ते आदेश निर्गमित करावेत.**

28/05/2024

**(डॉ. हिम्मत जाधव)**
अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अति. कार्यभार)

**प्रत माहितीकरीता व उचीत कार्यवाहीकरीता रवाना:**

१. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये
२. प्र-कुलगुरु कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
३. कुलसचिव कार्यालय, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबई
४. श्री. निलेश कासले, एज्युकेशन टेक्नॉलॉजी, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू, सदर परिपत्रक ॲफिलिएशन पोर्टलवर प्रसिध्द करावे.
५. समन्वयक, मे.निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा.लि, नागपूर सदर परिपत्रक ॲफिलिएशन पोर्टलवर प्रसिध्द करावे.

*d:\vinita\university circular\circular.docx*